# प्रेस नोट

**प्राण्यांना कृरतेने वागणुक देवुन अवैध रित्या कत्तलीकरीता वाहतुक करणारे ईसमाविरूध्द आसेगाव पोलीसांची धडक कार्यवाही**

मा. पोलीस अधीक्षक साहेब वाशिम यांनी जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन करून कायदेशीर कारवाई करणे बाबत जिल्हयातील सर्व पोस्टेला सक्त आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सर्व पोस्टे हददीत अवैध धंदयांवर कडक कार्यवाहया सुरू आहेत.

वरीष्टांच्या निर्देशानुसार पोस्टे आसेगाव हददीत दिनांक १३/०२/२०२२ रोजी ठाणेदार सपोनि नरसाळे, पोउपनि खंदारे व त्यांचे पथक गस्तीवर असतांना त्याना मिळालेल्या माहीतीच्या आधारे ग्राम धानोरा येथील धानोरकर विदयालयासमोर. धानोरा ते आसेगाव रोडवर एका आयशर गाडी क्र एम एच १५ जि व्ही ००९० या मध्ये अवैध रित्या जनावरांना निर्दयतेने वागनुक देवुन वाहनामध्ये कोंबुन. म्हैस जातीचे एकुन ४० जनावरे त्यापैकी ३५ हाले व ०५ वगारी अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आला. सदरचे एकुन ४० जनावरे किंमत २४००००/रू व वाहतुक करनारा आयशर ट्रक क्र एम एच १५ जि. व्ही ००९० किंमत ५०००००/रू असा एकुन ७४००००/रू चा माल आरोपी १) चालक शेख अल्ताब शेख मुस्ताक वय २९ वर्ष २) मालक शेख सलमान शेख उस्मान वय ३५ वर्ष दोन्ही रा. आसेगाव यांचे कडुन जप्त करून त्यांचे विध्द पोस्टे आसेगाव येथे फिर्यादी पोकॉ गणेश बर्गे ब. नं १४६७ यांचे लेखी रिपोर्ट वरून अप. नं. ३५/२०२२ प्राण्यांना क्रूरतेने बागविण्यास प्रतीबंध करण्याबाबत अधीनियम १९६० (सुधारीत) कलम ११(१)(घ)(ड) सह कलम महाराष्ट्र प्राणीसंरक्षण अधीनियम (सुधारीत) कलम ५(अ) (१), ९ प्रमाने गुन्हा दाखल करून आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक सा. वाशिम श्री. बच्चन सिंह, मा. अपर पोलीस अधीक्षक सा. श्री. गोरख भांमरे, मा.एसडीपीओ, मं.पीर श्री. यशवंत केडगे सा. यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. संदीप नरसाळे (ठाणेदार पोस्टे आसेगाव), पोउपनि. रविकिरण खंदारे, पोहेकॉ/६४१ गणेश भोयर, ७७३/वासुदेव चौधरी व पोकॉ/१४६७ गणेश बर्गे, १८५/केदेश्वर फुलुबरकर यांचे पथकाने केली आहे.

for [signature]
ठाणेदार
पो.स्टे.आसेगांव जि.वाशिम

Scanned by CamScanner